बाप्पा मोरया...
मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.in
» पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२३। पान १

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची श्री मोरया गोसावी महाराज यांच्या समाधी मंदिरास भेट!

## महाराष्ट्र राज्याची सर्व क्षेत्रात उत्तम प्रगती व्हावी हा संकल्प: अजितदादा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्याचे उमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार यांचा आज (दि.२४) चिंचवड मधील विविध गणेशोत्सव मंडळांना भेट देण्याचा कार्यक्रम होता. याची सुरवात त्यांनी सकाळी ९.३० वाजता चिंचवड येथील महान गाणपत्य श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन केली. याप्रसंगी अजितदादांनी महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेला सुख-शांती-समृध्दी आणि निरोगी आयुष्य लाभावे. तसेच वरुणराजाची कृपा होऊन बळीराजा सुखात नांदावा व महाराष्ट्र राज्याची सर्व क्षेत्रात उत्तम प्रगती व्हावी हा संकल्प सोडत श्री मोरया गोसावी चरणी अभिषेक करून आरती केली. श्री मोरया गोसावी महाराजांच्या समाधीला प्रदक्षिणा घालत असताना चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव यांनी अजितदादांना मोरया गोसावी यांच्या जीवन चरित्रा विषयी थोडक्यात धार्मिक आणि ऐतिहासिक माहिती दिली. याप्रसंगी श्री मोरया गोसावी महाराजांचे वंशज व चिंचवड देवस्थानचे विश्वस्त क्रमांक २ जितेंद्र देव, आणि निरंजन देव, अभिषेक देव, ऋषिकेश देव तसेच श्री मोरया गोसावी देव मंडळाचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देव आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पिंपरी चिंचवड अध्यक्ष अजित गव्हाणे, भोसरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, अपर्णा डोके, अखिल भारतीय



मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नेते विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी नगरसेवक ॲड.संदीप चिंचवडे, राजाभाऊ गोलांडे, जयहिंद बँकेचे संचालक राहूल भोईर, आणि चिंचवड देवस्थान ट्रस्ट चे कारभारी किशोर जोशी हे मान्यवर आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्ट तर्फे विश्वस्त क्रमांक २ जितेंद्र देव यांच्या हस्ते अजितदादांना शाल, श्रीफळ, मोरयांची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर म्हणा मंगलमूर्ती मोरया या नाम गजरात अजितदादांनी आपल्या पुढील कार्यक्रमासाठी प्रस्थान

### धार्मिक आणि ऐतिहासिक माहिती

» अजितदादांनी महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेला सुख-शांती-समृध्दी आणि निरोगी आयुष्य लाभावे. तसेच वरुणराजाची कृपा होऊन बळीराजा सुखात नांदावा व महाराष्ट्र राज्याची सर्व क्षेत्रात उत्तम प्रगती व्हावी हा संकल्प सोडत श्री मोरया गोसावी चरणी अभिषेक करून आरती केली. श्री मोरया गोसावी महाराजांच्या समाधीला प्रदक्षिणा घालत असताना चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव यांनी अजितदादांना मोरया गोसावी यांच्या जीवन चरित्रा विषयी थोडक्यात धार्मिक आणि ऐतिहासिक माहिती दिली.

# राष्ट्रवादीची महिला कार्यकारणी जाहीर!

## शारदा काटे-चोकशी यांची शहर कार्याध्यक्षपदी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेसची (शरद पवार) गटाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. शारदा काटे-चोकशी यांची शहर कार्याध्यक्षपदी, स्वप्नाली आसोले यांची चिंचवड विधानसभा अध्यक्षपदी, तर पूजा आल्हाट यांची भोसरी विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काळेवाडी येथील पक्ष कार्यालयात शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर यांच्या नेतृत्वात कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी शहर तसेच विधानसभा स्तरावरील ५० महिला पदाधिकाऱ्यांची वेगवेगळ्या पदांवर पदनियुक्ती करण्यात आली. युवक अध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, शरद पवार यांच्या धोरणामुळे राज्यात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण मिळाले. पवार साहेबांनी नेहमीच ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या धोरणावर काम केले. पवार साहेबांवर निष्ठा असणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची आज विविध पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. महिला अध्यक्षा ज्योती निंबाळकर म्हणाल्या, शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, विद्या चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी (छउझ) खडसे यांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्तीची महिला शहराध्यक्षपदी नियुक्ती केली. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने वाढती महागाई, बेरोजगारी, महिला अत्याचार, आरोग्य विषयी समस्या, शैक्षणिक क्षेत्रातील संबंधित अडचणी यासारख्या प्रश्नावर आवाज उठविण्यात येईल. ओबीसी सेल अध्यक्ष विशाल जाधव, विद्यार्थी अध्यक्ष राहुल आहे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. रेखा मोरे,सुप्रिया कवडे,सुजाता पाटील,पंचशीला आगळे, उज्वला सस्ते, रोहिणी जाधव, सुनंदा वाघ,हलिफा शेख,स्वाती जाधव,यास्मिन शेख, प्राची ससाणे यासोबतच शहर कार्यकारणी विधानसभा कार्यकारणी आणि प्रभाग कार्यकारणी या पदावर इतर महिलांची देखील नियुक्ती करण्यात आली.



# मोशी गणेशोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर!

## वक्तृत्व, पाककला, फॅन्सीड्रेस अशा विविध स्पर्धांद्वारे युवापिढीला प्रोत्साहन

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** गणेशोत्सवानिमित्त परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे. वुड्सविले फेज १, कुमार प्रिन्सविले, साईहिरा क्लासिक, रिव्हर रेसिडेन्सी तर चिखलीतील पार्श्व प्लॅटिनम, संस्कृती, केसर व्हॅली अशा विविध सोसायट्यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल दिसून येत आहे. यासोबतच सामाजिक भान जपून विविध शिबिरं भरवली जात आहेत. चिमुकल्यांच्या आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यावर अधिक भर दिला जात असल्याचे चित्र पहायला मिळते आहे. कुमार प्रिन्सविले सोसायटीमध्ये दहा दिवसांसाठी बाप्पांचे नियोजन आहे. दर दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन,त्यातून सामजिक संदेश देण्याचे काम सोसायटीच्या सदस्यांकडून आणि चिमुकल्यांकडून केले जात आहे. महाराष्ट्रीयन संस्कृती, संत परंपरा, थोर पुरुषांचे विचार याबाबत सादरीकरण करण्यात आले. विशेषतः महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी खाद्यपदार्थ, कलाकृतींचे स्टॉल उभारण्यात आले. सांस्कृतिक कमिटीच्या सहकार्याने उपक्रम घेतले जातात. वुड्सविले सोसायटी फेज वन मध्ये मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जातो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुध्दा सोसायटीच्या बाप्पांचे दर्शन घेतले. अबालवृध्दांनी गणेशोत्सवातील विविध उपक्रमात सहभाग घेऊन धमाल केली. चिमुकल्यांसाठी टॅलेन्ट शो, जेष्ठांसाठी एकांकिका, महिलांसाठी मंगळागौर असे विविध उपक्रम घेण्यात आले. साईहिरा क्लासिक सोसायटीमध्ये वेगवेगळे पेहराव करून आरती, नामस्मरण, सत्यनारायण महापूजा असे धार्मिक उपक्रम घेण्यात आले. चिखलीतील पार्श्व प्लॅटीनम सोसायटीमध्ये सर्व जाती-धर्मांच्या सदस्यांनी एकत्रित येऊन गणेशाची स्थापना केली. त्यानंत चिमुकल्यांसाठी विविध शो घेतले. लिंबू चमचा, संगीत खूर्ची, रांगोळी, पाककला, फॅन्सी ड्रेस अशा विविध स्पर्धा घेऊन प्रोत्साहन दिले. केसर व्हॅली, संस्कृती या सोसायट्यांमध्येही सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.



### पाणी वाचवाचे धडे

» गणेशोत्सवानिमित्त सोसायट्यांमध्ये पाणी वाचवा चा संदेश मोठ्या प्रमाणात देण्यात आला. भर पावसाळ्यात मोशी परिसरातील काही सोसायट्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होतो आहे. त्याचा फटका नागरिकांच्या खिशाला होत असल्याने गणेशोत्सवामध्ये पाणी वाचवा चा संदेश देण्यावर सोसायट्यांनी भर दिल्याचे दिसून आले.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी सफाई मित्र सुरक्षा शिबिर!

## स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी हा उपक्रमांचा हेतू

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** स्वच्छ भारत अभियानांतर्गत सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणीसारखे विविध उपक्रम महापालिकेच्या वतीने राबविले जात आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी, हा या उपक्रमांचा हेतू आहे. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यात आपले सफाई मित्र दिवसरात्र काम करत असतात, पण ही जबाबदारी पार पाडत असताना त्यांना स्वतः:च्या आरोग्याकडे लक्ष देणे बऱ्याचदा शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या आरोग्यासाठी महापालिका सतत प्रयत्नशील असून सफाई कर्मचाऱ्यांनीही वेळोवेळी आपली आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी करून सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छाही दिल्या. प्रभाग क्रमांक ९ मधील डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल, स्केटिंग ग्राऊंड, मासुळकर कॉलनी, अजमेरा येथे अ, क, इ, फ क्षेत्रीय कार्यालयातील स्वच्छता विषयक कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. या शिबिरास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, राजेश आगळे, अण्णा बोदडे, सिताराम बहुरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वैद्यकीय अधिकारी,सहकारी सहाय्यक आरोग्याधिकारी, आरोग्य निरिक्षक तसेच सफाई कर्मचारी उपस्थित होते. 'इंडियन स्वच्छता लीग २.०' च्या दुसऱ्या भागात १७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर रोजी महापालिका रुग्णालयांमध्ये आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सफाई मित्र सुरक्षा शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये महानगरपालिका तसेच संस्थांचे सर्व स्वच्छता विषयक कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तपासणी करण्यात आली. आज सुमारे १ हजार १७३ सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३३ कर्मचाऱ्यांनामधुमेह, रक्तदाब अशी लक्षणे आढळल्याने रुग्णालयांकडे शिफारस पत्र (रेफर चिट) देण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय विभागाकडून मिळाली. शिबिराच्या सुरूवातीस सर्व उपस्थित अधिकारी, सफाई कर्मचाऱ्यांनी आम्ही स्वतः स्वच्छतेच्या बाबतीत जागरूक राहू आणि स्वच्छतेसाठी वेळही देवू. आम्ही स्वतः घाण करणार नाही, आणि दुसऱ्यालाही करू देणार नाही.




### माझी माती माझा देश अंतर्गत शपथ

» सर्व प्रथम आम्ही स्वत: पासून, आमच्या कुटुंबापासून, आमच्या गल्लीपासून, आमच्या गावापासून तसेच आमच्या कार्यस्थळापासून या स्वच्छतेच्या कामास सुरूवात करू. आम्हाला हे मान्य आहे की, जगामधील जे देश स्वच्छ आहेत, त्याचे कारण त्या ठिकाणचे नागरिक स्वत: घाण करीत नाहीत व घाण करू देत नाहीत. या विचारांनी आम्ही गावोगावी आणि गल्लोगल्ली स्वच्छ भारत मोहीमेचा प्रचार करू. आम्ही आज शपथ घेत आहोत, ती आणखी १०० लोकांनाही घ्यायला लावू. आम्हाला माहिती आहे की, स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले आमचे पाऊल संपूर्ण देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करेल, अशी स्वच्छता शपथ घेतली तसेच माझी माती माझा देश अंतर्गत पंचप्रण शपथ देखील घेतली.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी राज्यस्तरीय समिती!

## समिती तत्काळ नेमण्याचा निर्णय परिषदेत घेण्यात आला

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा आरक्षण आणि मराठा समाजातील नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे सहजासहजी मिळावीत, यासाठी कायदेशीर बाजू सरकारकडे मांडण्याचा निर्णय सकल मराठा समाजाच्या बैठकीत घेण्यात आला. मराठा समाजातील ज्येष्ठ कायदे तज्ज्ञ, संख्या शास्त्रज्ञ, समाज शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ तसेच इतिहास आणि समाजशास्त्रीय अभ्यासकांची एक राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती तत्काळ नेमण्याचा निर्णयही सकल मराठा समाज आयोजित आरक्षण परिषदेत घेण्यात आला. जालना जिल्ह्यात मनोज जरंगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाच्या वतीने पुण्यात आरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, ॲड. विजयकुमार सपकाळ, ॲड. आशिष गायकवाड, ॲड्. राजेश टेकाळे, एमपीएससीचे माजी चेअरमन मधुकरराव कोकाटे, माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट, डी. डीय देशमुख, ॲड. रमेश दुबे पाटील, ॲड. मिलिंद पवार, राजेंद्र कोंढरे, संजीव भोर, प्राचार्य प्रल्हाद बोराडे, माधव देवसरकर. ॲड सुहास सांवत, बाळासाहेब आमराळे, राजेंद्र कुंजीर आदी उपस्थित होते. कायदे तज्ज्ञ, अभ्यासक, विविध विषयांतील अभ्यासकांची तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून आठवडाभरात या समितीतील सर्व तज्ज्ञांची नावे माजी कुलगुरू सर्जे राव निमसे लवकरच जाहीर करणार आहेत. ही समिती कायदेशीर संस्थेकडून मराठा आरक्षणाबाबतचा अभिप्राय घेणार आहे. त्यानंतर पुढील दिशा ठरविली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती भोसले समितीच्या सूचना आणि सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे. मराठा आरक्षण आणि मराठा कुणबी प्रमाणपत्रांबाबत भूमिका घेतली जावी, समाजाची मागणी कायदेशीरदृष्ट्या परिपूर्ण असावी असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. मराठा समाजाचा सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा दर्जा पुन्हा प्राप्त करण्यासाठी, तसेच मराठा समाजाच्या सार्वजनिक सेवेतील प्रतिनिधित्वाच्या टक्केवारीबाबत सर्वोच्च न्यायालयाने गृहीत धरलेले सूत्र इंद्रा सहानी निकालास कसे छेद देणारे आहे, अशा बाबी प्रभावीपणे मांडण्यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचेही या परिषदेत ठरविण्यात आले.



### कायदेशीर मार्गाचा अवलंब

» ही समिती कायदेशीर संस्थेकडून मराठा आरक्षणाबाबतचा अभिप्राय घेणार आहे. त्यानंतर पुढील दिशा ठरविली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती भोसले समितीच्या सूचना आणि सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे. मराठा आरक्षण आणि मराठा कुणबी प्रमाणपत्रांबाबत भूमिका घेतली जावी, समाजाची मागणी कायदेशीरदृष्ट्या परिपूर्ण असावी असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

# ठाकरे गटाचे चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले!

## सुप्रिया सुळे यांची शिंदे गट व भाजपा सरकारवर टीकास्त्र

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** उद्धव ठाकरे यांचा पक्ष व त्यांचं चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले आहे. हे दुर्दैव असून ते महाराष्ट्राच्या राजकारणाला न शोभणारा आहे.असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर तसेच एकीकडे बेटी पढाव आणि बेटी बचाव म्हणणारी बिजेपीचे लोक पंकजा मुंडे यांच्यावर अन्याय करीत असून भारतीय जनता पार्टी त्यांना लेक मानत नाहीत का ? असा प्रश्न उपस्थित करीत खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपा वर जोरदार टीका केली. सुळे सोमवार (ता.२५) रोजी इंदापूर दौऱ्यावर आल्या असता पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती प्रवीण माने यांच्या निवासस्थानी युवा कार्यकर्ता संवाद बैठकीच्या प्रसंगी पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी सोनाई उद्योग समूहाचे अध्यक्ष दशरथ माने, माजी सभापती प्रवीण माने, माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल भिसे, किसन जावळे सागर मिसाळ,विठ्ठल ननवरे,छाया पडसळकर, भारत मोरे,किशोर माने यांच्यासह युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आमदार अपात्रताप्रकरणी आज सोमवार रोजी विधान भवनात सुनावनी पार पडली. यावर बोलताना खा.सुळे म्हणाल्या,स्पीकरच्या ऑफिसवर सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढले. सुप्रीम कोर्टाने सांगितल्यावर तरी काहीतरी निर्णय होईल अशी आमची अपेक्षा होती. जी शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केली होती ते जिवंत असताना त्याची जबाबदारी उद्धव ठाकरे यांवर दिली. ही पार्श्वभूमी असताना त्यांच्याकडून त्यांचा पक्ष त्यांचं चिन्ह काढून घेण्याचं पाप शिंदे गटाने केले आहे. हे दुर्दैव असून ते महाराष्ट्राच्या राजकारणाला न शोभणारा आहे.अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेवर केली. तर पंकजा मुंडे यांच्या कारखान्यावर झालेल्या कारवाई संदर्भात बोलताना खा.सुळे म्हणाल्या, गोपीनाथ मुंडे हयात नाहीत म्हणून त्यांच्या लेकीशी तुम्ही कसेही वागाल ? हा अन्याय आहे. कोणतही राजकारण न करता या राज्यातील आणि देशातील कुठल्याही लेकीवर अन्याय होत असेल तर मी तिच्या बाजूने खंबीरपणे उभी राहिल. पंकजा मुंडे यांचे वडिल गोपीनाथ मुंडे यांनी हयात असताना जेवढं भारतीय जनता पक्षाचे केले तेवढे करणारे महाराष्ट्रात नेते कमी असतील. सत्तेत नसताना पक्ष सत्तेत असण्यासाठी केवढे कष्ट केले. आज त्यांची मुलगी लढतेय.मात्र भारतीय जनता पक्ष म्हणा किंवा अदृश्य हाताने त्यांच्या घराचा लिलाव कसा थांबवला असा सवाल उपस्थित करीत एकीकडे बेटी पढाव आणि बेटी बचाव म्हणणारी ही लोक मग पंकजा मुंडे भारतीय जनता पार्टीची लेक नाही का ? असा प्रति सवाल ही खा. सुप्रिया सुळे यांनी भाजपाला केला आहे.



### महारुद्र पाटील राष्ट्रवादीच्या वाटेवर

» मागील वर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करून इंदापूर तालुका प्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारलेले विद्यमान तालुकाप्रमुख महारुद्र पाटील हे खासदार सुप्रिया सुळे यांच्या आजच्या दिवसभराच्या दौऱ्यात उघडपणे उपस्थित होते.यामुळे पाटील हे लवकरच राष्ट्रवादीशी घरवापसी करणार असे चित्र होते.

# सरकारी शाळा दत्तक योजना : निर्णयाच्या विरोधात संघटना आक्रमक!

## बैठकीत जवळपास ३९ संघटनांनी एकत्रित

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून समूह शाळा विकसित करणे असो वा सरकारी शाळा दत्तक योजना, कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरतीचा निर्णय असो राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाला राज्यातील विविध संघटना विरोध करत आहेत. सरकारच्या निर्णयाविरोधात विविध संघटना आता आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. राज्यातील सरकारी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देण्याच्या नावाखाली सरकारने दत्तक योजना आणली. याअंतर्गत खासगी कंपन्या किंवा दानशूर व्यक्तींना शाळा दत्तक देण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले. तसेच त्यांचे नावही शाळेला देता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरतीलाही मान्यता दिली. एवढंच नव्हे तर कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करून समूह शाळा विकसित करण्याचा निर्णय घोषित केला. या निर्णयामुळे राज्य सरकार शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत नसल्याची टीका विविध संघटनांकडून होत आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण बचाव कृती समितीच्या नुकत्याच पुण्यात झालेल्या बैठकीत जवळपास ३९ संघटनांनी एकत्रित येऊन सरकारने निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तर युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटनेच्या वतीने 'एक्स'वर विशिष्ट हॅशटॅग वापरून सरकारच्या या निर्णयाचा निषेध करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष संदीप कांबळे म्हणाले,'' सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सहा टक्के शिक्षणावर खर्च होणे अपेक्षित असताना देशात केवळ २.५ टक्के खर्च शिक्षणावर होत आहे. राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय दुर्दैवी आहे.



### सरकार शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत नाही

» कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरतीलाही मान्यता दिली. एवढंच नव्हे तर कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करून समूह शाळा विकसित करण्याचा निर्णय घोषित केला. या निर्णयामुळे राज्य सरकार शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत नसल्याची टीका विविध संघटनांकडून होत आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण बचाव कृती समितीच्या नुकत्याच पुण्यात झालेल्या बैठकीत जवळपास ३९ संघटनांनी एकत्रित येऊन सरकारने निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तर युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटनेच्या वतीने 'एक्स'वर विशिष्ट हॅशटॅग वापरून सरकारच्या या निर्णयाचा निषेध करण्यात आला.

# साखर दरांसाठी द्विस्तरीय पद्धत लागू करण्याची गरज!

## साखरेचा घरगुती वापरापेक्षा व्यावसायिक वापर आरोग्यमंत्री : डॉ. तानाजी सावंत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** साखर उद्योग टिकवायचा असेल, तर साखर दरासाठी द्विस्तरीय पद्धत लागू करण्याची गरज आहे, त्यासाठी लेव्ही पुन्हा आणली तरी चालेल, अशी ठोस सूचना आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी केली. दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) च्या ६८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. साखर कारखानदारीच्या तांत्रिक प्रगतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या 'डीएसटीए'तर्फे 'शुगर एक्स्पो'चेही आयोजन केले आहे. त्यात देशभरातील कंपन्यांनी सहभाग घेतला आहे 'डीएसटीए'चे अध्यक्ष एस. बी. भड, उपाध्यक्ष (महाराष्ट्र) एस. एस. शिरगांवकर, उपाध्यक्ष एम. के. पटेल (गुजरात), उपाध्यक्ष (तंत्र) एस. डी. बोखारे, कार्यकारी सचिव गौरी पवार, राज्य साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, व्हीएसआय'चे महासंचालक संभाजी कडू पाटील, 'एनएसआय'चे संचालक नरेंद्र मोहन, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे आदी या वेळी उपस्थित होते. सावंत म्हणाले, साखरेचा घरगुती वापरापेक्षा व्यावसायिक कारणासाठी अधिक वापर होतो. घरगुती वापराची साखर १५ रुपये किलोने विक्री करावी, त्यासाठी लेव्ही द्यायचीही आमची तयारी आहे, मात्र व्यावसायिक वापराची साखर ६० रुपयांपेक्षा अधिक दराने विकता आली पाहिजे. व्यावसायिक कारणांसाठी ३५ रुपये किलोची साखर वापरून प्रचंड नफा कमावत आहेत. परंतु प्रत्यक्षात साखर उद्योग चालवताना कारखानदारांचे हाल होत आहेत. सोमवारी (ता. २५) या दोन दिवसीय अधिवेशनाचा समारोप झाला. अधिवेशनात तंत्रज्ञान, उत्पादन, शेती, व्यवस्थापन आणि उपपदार्थ निर्मिती विषयांवर ४८ शोधनिबंध तज्ज्ञांनी सादर केले . त्यात उपपदार्थ निर्मितीमध्ये ग्रीन हायड्रोजन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इथेनॉल, ऊस उत्पादन वाढीसाठी नवीन बियाणे, साखर कारखानदारीसाठी उपलब्ध वीज आणि वाफ यांचा किफायतशीर वापर या ज्वलंत विषयावरील शोधनिबंधांचा समावेश होता. याप्रसंगी साखर उद्योग आणि संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना सन्मानित करण्यात आले.



### उद्योग चालवताना कारखानदारांचे हाल

» साखरेचा घरगुती वापरापेक्षा व्यावसायिक कारणासाठी अधिक वापर होतो. घरगुती वापराची साखर १५ रुपये किलोने विक्री करावी, त्यासाठी लेव्ही द्यायचीही आमची तयारी आहे, मात्र व्यावसायिक वापराची साखर ६० रुपयांपेक्षा अधिक दराने विकता आली पाहिजे. व्यावसायिक कारणांसाठी ३५ रुपये किलोची साखर वापरून प्रचंड नफा कमावत आहेत. परंतु प्रत्यक्षात साखर उद्योग चालवताना कारखानदारांचे हाल होत आहेत. सोमवारी (ता. २५) या दोन दिवसीय अधिवेशनाचा समारोप झाला. अधिवेशनात तंत्रज्ञान, उत्पादन, शेती, व्यवस्थापन आणि उपपदार्थ निर्मिती विषयांवर ४८ शोधनिबंध तज्ज्ञांनी सादर केले.